**<u>सं.फौ.ख.क्र. ४१/२०२३</u>**
**<u>निशाणी क्रमांक ९/क</u>**

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग शिंदखेडा यांचे न्यायालय

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराधाची दिनांक | : | २१.०४.२०२२ |
| २. | तक्रारीची दिनांक | : | १५.०९.२०२२ |
| ३. | फिर्यादीचे नांव, वय व पत्ता | : | महाराष्ट्र शासन मार्फत पो.स्टे.शिंदखेडा, ता. शिंदखेडा जि. धुळे |
| ४. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | : | शरद विक्रम उर्फ भिका ठाकरे, वय– ३९ वर्ष, रा.सार्वे ता. शिंदखेडा |
| ५. | अपराधाचा तपशील | : | |

दि. २१.०४.२०२२ रोजी दुपारी १२.३० वाजताच्या सुमारास सोनगीर ते बाभळे फाटा मार्गे सोनगीरकडे जात असतांना जामफळ धरणालगत मारुती मंदीरापासुन अर्धा कि.मी. अंतरावर रोडावर, तुम्ही तुमच्या ताब्यातील वाहन ॲपेरीक्षा क्र. एमएच–१८–डब्लु–२७०२ ही एखाद्या व्यक्तीच्या जीवास धोका होईल किंवा दुस–या कोणा व्यक्तीस दुखापत किंवा नुकसान बहुतेक करुन होईल अशा पध्दतीने अविचाराने, लापरवाहीने किंवा हयगयीने चालविले आणि अशा प्रकारे, त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम २७९ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन रोडाचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन पलटी करुन अपघात केला व तुमच्या ॲपेरीक्षामध्ये मागच्या सीटवर बसलेल्या फिर्यादी भटाबाई गणेश ठाकरे तसेच रीक्षात बसलेले इतर व्यक्ती यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल किंवा त्यांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणा–या कृतीने त्यांना किरकोळ दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३३७ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यातील वर नमूद वाहन रोडाचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन पलटी करुन अपघात केला व तुमच्या ॲपेरीक्षामध्ये मागच्या सीटवर बसलेल्या फिर्यादी भटाबाई गणेश ठाकरे तसेच रीक्षात बसलेले इतर व्यक्ती यांच्या जिवीतास धोका निर्माण होईल किंवा त्यांची व्यक्तीगत सुरक्षितता धोक्यात आणणा–या कृतीने त्यांना गंभीर दुखापत पोहोचवली व त्याद्वारे तुम्ही भारतीय दंड संहितेच्या कलम ३३८ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

वरील तारखेस, वेळी व ठिकाणी, तुम्ही तुमच्या ताब्यात वर नमूद वाहन रोडाचे परीस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन पलटी करुन अपघात केला व त्यामुळे तुम्ही मोटार वाहन कायदा कलम १८४ प्रमाणे शिक्षापात्र असलेला व या न्यायालयाचे दखलगीरीतील गुन्हा केलेला आहे.

वरील सर्व अपरांधाकरीता मी दखल घेतली आहे आणि याद्वारे मी असे निर्देश देत आहे की, तुमच्या विरुद्ध वरील आरोपान्वये खटला चालविण्यात यावा.

सही/---
(विनिता आ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः ०६/०५/२०२४

वरील पर्टीकुलर मधील मजकूर हा आरोपीस त्याच्या भाषेमध्ये वाचून व समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले. त्याचे म्हणणे खाली नोंदविण्यात आलेले आहे.

सही/---
(विनिता आ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः ०६/०५/२०२४

६. **आरोपीचे प्रतिकथन** :

अ) : तुम्हाला दोषारोपपत्र व पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय.

ब) : तुम्हाला आता वाचून व समजावून सांगितलेला अपराधाचा तपशिल कळला काय ?
उत्तर : होय.

क) : तुम्हाला गुन्हा कबुल आहे का ?
उत्तर : नाही.

ड) : तुम्हाला सरकारी खर्चाने वकील हवा आहे का ?
उत्तर : नाही.

-------------------
आरोपीची स्वाक्षरी/अंगठा

सही/---
(विनिता आ. नाईक)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.२) शिंदखेडा

दिनांकः ०६/०५/२०२४